# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १५१** **दिनांक ०९/०६/२०२१**

## पॅरागॉन चप्पल चोरी करणा-या चोरांना अटक करुन १८,४४,४५९/-रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात वालीव गुन्हेप्रकटीकरण शाखेस यश

वालीव पोलीस ठाणे हद्दीत समिउल्ला कंम्पाऊंड,वसई फाटा,वसई पुर्व येथे फिर्यादी डायमंड नाजमिन हजियानी, यांचे पॅरागॉन चप्पल गोडावुन मध्ये अज्ञात आरोपीत यांनी लाखोंच्या मालाची घरफोडी चोरी केलेबाबत वालीव पोलीस ठाणे येथे दिनांक.२५/०५/२०२१ रोजी गु.र.क्र. ४९८/२०२१ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील घटनास्थळाचे सिसिटीव्ही फुटेज व तात्रिंक पुराव्यांच्या आधारे वालीव गुन्हेप्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी पालघर येथुन १) मेहबुब शेख, वय-२२ वर्षे,रा.ठी.माधव मेस्त्री चाळ,जुना पालघर,जि.गुलबर्गा, २)सरोज राऊत, वय-२४वर्षे, रा.आदर्शनगर, ता.जि.पालघर यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांचा साथीदार नामे ३) इम्तियाज सुरानी,वय-२५ वर्षे, रा.ठि. दिनदयाल नगर,वसई पश्चिम यांने सदर गोडावुनची बनावट चावी बनवुन त्या चावीचे साहयांने वेळावेळी गोडावुन मधील पॅरागॉन चप्पलचा माल चोरी केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीत यांनी सदरचा माल हा भाईंदर, जव्हार, पालघर, वाडा या ठिकाणी विकल्याची माहीती मिळाल्याने सदर ठिकाणी छापे टाकुन चोरीचा माल विकत घेणारे व्यापारी यांना अटक करुन गुन्हयात वापरलेले एक महिंद्रा कंपणीचा पिकअप जिप, वॅगनार कार, पल्सर बाईक व पॅरागॉन कंपनीचे चप्पल असा एकुण १८,४४,४५९/-रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन गुन्हा उघडकिस आणण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परीमंडळ क्र.०२ , श्री.अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोनि/श्री.राहुलकुमार पाटील,व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि./ज्ञानेश फडतरे, पो.उप.निरी/भोईर, पो.हवा./मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.ना./सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, अनिल सोनवणे, सतिष गांगुर्डे, पोशि/ विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, सचिन बलीद, गजानन गरीबे, निखिल मंडलिक यांनी केलेली आहे.

.....................ooooooooooo..................